# प्रस्तावना

दैनंदीन पोलीस कामकाज करतांना लोकाभिमुख पोलीस प्रशासनाचा अनुभव समाजातील विविध स्तरातील घटकांना येण्याकरिता पोलीसांनी जनतेबरोबर प्रभावी जनसंपर्क प्रस्थपित केल्यास पोलीस आपल्या कर्तव्यात निश्चितपणे यशस्वी होतील यात तिळमात्रही शंका नाही.

पोलीस दल आणि जनता यामधील संबंध सुधारण्यासाठी बरेच काही करता येईल आणि पोलीस ठाणे अंमलदार, पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी हे पोलीसांचे कामकाज बरेच हलके करु शकतात. उदा. त्याने फिर्यादीला कनवाळूपणे वागविले पाहिजे, तसेच समाजातील तळागाळातील व दुर्बल घटक जसे लहान मुले, महिला, जेष्ठ, दलित, अल्पसंख्यांक इत्यादिसोबत संवेदनशीलपणे व सामाजिक उत्तरदायीत्वाचे तसेच आपल्या कर्तव्याचे योग्य भान ठेवून त्यांच्याशी आदराने वागावे.

पोलीसांच्या दैनंदिन कामकाजादरम्यान ब-याच वेळा अनावधानाने पोलीस अंमलदाराकडून जनतेला चांगली वागणूक दिली जात नाही. जनतेच्या पोलीसांप्रती असणा-या प्रमुख तक्रारीं पैकी ब-याच तक्रारी हया आपल्या वागण्यात थोडया प्रमाणात सकारात्मक बदल केल्यास दर होवू शकतात. जसे समाजात वावरतांना प्रत्येक व्यक्तीशी आदराने वागून व आपले कर्तव्य प्रामाणिकपणे बजावून जनतेच्या मनात आपली प्रतिमा उंचावू शकतो.

प्रत्येक पोलीस अंमलदाराने हे सतत लक्षात ठेवले पाहिजे की तो जनतेचा सेवक आहे आणि त्यामुळे त्यांच्याशी योग्य त्या सन्मानाने वागण्याचे त्याच्यावर बंधन आहे. कोणत्याही पोलीसाने मग तो रस्त्यात असो, पोलीस ठाणे किंवा चौकीत असो, गस्त कर्तव्यावर असो, किंवा कोणत्याही ठिकाणी असो त्याने त्याच्या क्षमतेची पराकाष्टा करुन मदत केली पाहिजे. पोलीसाने जनतेवर आवश्यकतेपेक्षा जास्त बंधन लादू नये, आणि त्याने जनतेशी वागतांना सहनशीलता, सुसंस्कृतपणा आणि सन्मान हे आवश्यक गुण अंगीकारले पाहीजे. तसेच स्त्रियांशी व मुलांशी सभ्यतेने व योग्य त्या मर्यादेने वागले पाहिजे. तसेच जनतेतील प्रत्येकाशी विनयशिलतेने वागणे हे पोलीसांचे कर्तव्य आहे. कर्तव्यावर असतांना जनतेने मदतीसाठी नाव अथवा नंबर मागितला असता तो दिला पाहिजे.

# पोलीस जनता संबंधांच्या पार्श्वभुमीवर पोलीसांनी दैनंदिन कामकाज पारपाडतांना खालील मुददयांचा विचार करणे अगत्याचे ठरते.

1) **स्वच्छ पोलीस प्रतिमा** - पोलीस दलातील प्रत्येक सदस्याने स्वत:ला सर्वसाधारण जनतेचा सेवक आणि रक्षणकर्ता समजले  पाहिजे. या पार्श्वभुमीवर आपले कर्तव्य बजावतांना पोलीसांना जनमाणसांत मानाचे स्थान लाभावे, त्यांची प्रतिमा स्वच्छ व उंच व्हावी यासाठी पोलीसांनी प्रयत्नशील असावे.

2) **सदरक्षणाय खलनिग्रहणाय -** पोलीसांनी आपले ब्रिदवाक्य, सद्रक्षणाय खलनिग्रहणाय या वाक्यांचा अर्थ डोळयासमोर ठेवुन  सामान्य जनतेच्या रक्षणासाठी, सेवेसाठी व दुर्जनांच्या निर्दलनासाठी सदैव तत्पर अशी वर्तणुक ठेवावी. म्हणजे जनता व पोलीसांचे मित्रत्वाचे संबंध प्रस्थपित होतील.

3) **तत्परता :-** पोलीसांनी आपल्या दैनंदिन कर्तव्यात जनतेच्या सेवेसाठी नेहमी तत्पर असावे. उदा. नैसर्गिक आपत्ती व आणीबाणी  प्रसंगी जनतेच्या सेवेसाठी धावून जावे (उदा.पूर, आगीच्या घटना इ.)

4) **सौजन्यशील वागणुक :-** समाजात पोलीसांची जनतेप्रती वागणूक सौजन्यशील आसावी. आपल्या वागण्यातून व बोलण्यातून  त्याची प्रचिती जनतेला यावी. उदा. सामान्य जनतेशी बोलतांना तू ऐवजी तुम्ही आणि आपण असे संबोधावे.

5) **नि:पक्षपातीपणा :-** पोलीसांनी कर्तव्य बजावतांना आपली ओळख फक्त पोलीसच आहे हे मनात ठेवावे. तसेच कोणत्याही प्रकारच्या समाजातील भेदभावास बळी न पडता समाजातील सर्व घटकांना समान वागणूक दयावी. उदा. जातीय तणाव, आरक्षण आंदोलन.

6) **प्रामाणिकपणा:-** पोलीसांनी आपले कर्तव्य बजावतांना उच्च प्रतिच्या प्रामाणिकतेचे प्रदर्शन करावे. कोणत्याही प्रकारच्या आमिषाला बळी न पडता आपले कर्तव्य चोख बजवावे. उदा. रस्ता अपघाता दरम्यान ब-याच वेळा मौल्यवान वस्तू, दागिने, पैसे इ. घटनास्थळी बेवारस असतात. सदर घटने दरम्यान आपल्या कर्तव्याचे भान ठेवून सर्व वस्तू संबंधीत व्यक्ती अथवा त्यांचे नातेवाईक यांचे कडे सुपुर्द करणे.

7) **सचोटी :-** पोलीसांनी आपले कर्तव्य बजावतांना कितीही अडचणी आल्या तरी आपले कर्तव्य कायदयाने आखुन दिलेल्या चौकटीतच पार पाडावे. उदा. पोलीस अंमलदारास संवेदनशील ठिकाणी बंदोबस्त असल्यास त्याने तहान-भुक विसरुन आपले कर्तव्य बजावले पाहिजे.

8) **संवेदनशीलता :-** समाजातील सर्व घटकांशी संवेदनशीलपणे वागावे. उदा. मागासवर्गीय, दलित, अल्पसंख्यांक, महिला इ. पोलीस दलाशी निष्ठा व कठोर शिस्त यापंचतंत्राचा वापर करावा.

9) **प्रसिध्दीमांध्यमांशी समन्वय :-** पोलीसांची प्रतिमा चांगली व उज्वल होण्यासाठी पोलीसांनी प्रसार माध्यमाशी नेहमी चांगले व सलोख्याचे संबंध प्रस्थापित केले पाहिजेत. म्हणजेच वर्तमान पत्राचे वार्ताहर, संपादक, वाहिन्यांचे प्रतिनिधी, औदयोगिक क्षेत्रातील, उदयोग जगतातील प्रमुख व जनसंपर्क अधिकारी यांच्याशी सतत संपर्कात राहून पोलीस म्हणून आपली भूमिका बजावतांना या सर्व घटकांशी सुसंवाद प्रस्थापित करुन आपल्या भुमिकेसाठी त्यांचे समर्थन आपण प्राप्त करुन घ्यावे. पोलीसांनी केलेल्या चांगल्या कामाला प्रसिध्दीमाध्यमांमार्फत प्रसिध्दी दिली पाहीजे.

10) **पारदर्शक दृष्टीकोन : -** पोलीसांनी आपले दैनंदिन कामकाज करतांना पारदर्शक दृष्टीकोन ठेवला तर त्यांचे कामाविषयी संशय नष्ट होवून ते जनतेचा विश्वास संपादन करु शकतील व जनमानसात त्यांची प्रतिमा उज्वल होण्यास हातभार लागेल.

11) **विश्वासार्हता :-** सर्वसामान्य नागरिक त्यांचे सर्व मार्ग संपल्यावरच पोलीस ठाण्यात येतो.त्यावेळी पोलीसांनी सज्जन लोकांसाठी गुलाबाच्या फुलाप्रमाणे प्रसन्नता दयावी व दुर्जनांना काटयाप्रमाणे बोचले पाहिजे. म्हणजेच जनता आणि पोलीस यांच्यात सहकार्य व प्रेमाचे संबंध निर्माण होवून विश्वासाचे नाते निर्माण करावे व पोलीस ठाण्यात येणा-या प्रत्येक नागरिकाशी सौजन्याने वागावे.

12) **लहान मुलांशी वागणुक :-** लहान मुलांच्या संबधात काम करतांना लहान मुले हा घटक महत्वाचा, नाजुक व भावनिक असुन अशा प्रसंगी पोलीसांची कसोटी लागते. तेव्हा प्रकरण कौशल्याने काळजीपुर्वक हाताळावे. उदा. हरविलेली लहान मुले लोक बऱ्याचवेळा पोलीस ठाण्यात घेवून येतात. अशा वेळी लहान मुलांना प्रेमाने व कौशल्याने त्याची विचारपूस करुन त्याच्या नातेवाईकांचा शोध घेवून त्याला त्यांचे ताब्यात देणे गरजेचे असते.

13) **महिलांशी वागणुक :-** पोलीस ठाण्यात अर्जदार, तक्रारदार महिला असल्यास पोलीसांनी मर्यादेत राहुन आदरयुक्त भावनेने वागुन योग्य ती मदत केली पाहिजे. यासाठी पुढील सुभाषित कायमस्वरुपी लक्षात ठेवले पाहिजे.

14) **ज्येष्ठ नागरिक व विकलांग व्यक्तींशी वागणुक :-** जेष्ठ नागरिक व विकलांग ज्येष्ठ नागरिक यांना सामाजिक प्रतिष्ठा मिळवुन देण्याचा पोलीसांनी प्रयत्न केला पाहिजे.पोलीस हे मित्र व रक्षक असल्याची खात्री व विश्वास त्यांचे मनात दृढ करून सामाजिक सुरक्षिततेची भावना त्यांच्या मनामध्ये निर्माण होण्यास मदत होईल. उदा. कर्तव्यावर असतांना गस्ती दरम्यान अशा नागरिकांना रस्ता

ओलांडतांना, सार्वजनिक वाहतूकीचे साधन (टॅक्सी, रिक्षा, बस) मिळवून देण्यासाठी मदत केली पाहिजे.

15) **लोकप्रतिनिधींशी वागणुक :-** भारतीय समाजव्यवस्था ही लोकशाही प्रधान आहे. लोकप्रतिनिधी जनतेतुन निवडुन आलेले असतात. ते पोलीस स्टेशनला आल्यानंतर सन्मानाने व सौजन्यशील वागणुक देणे हे आपले कर्तव्य आहे. कोणताही लोकप्रतिनिधी एखाद्या प्रकरणासंबंधात पोलीस स्टेशनला आल्यानंतर त्यांना अपेक्षित असलेली माहिती आपणांस कायद्यानुसार शक्य असेल तर पुरविली पाहीजे. दैनंदिन कामकाज करित असतांना किंवा कायदा व सुव्यवस्था राखतांना देखील लोकप्रतिनिधींचा संबंध आल्यास आपली भाषा सभ्य व कायदेशीर असावी.

16) **धार्मिक नेते :-** वेगवेगळया धार्मिक सण उत्सवाच्या वेळी तसेच कायदा व सुव्यवस्था राखतांना वेगवेगळया धर्माच्या नेत्यांशी पोलीसांचा संबंध येत असतो. अशा धार्मिक नेत्यांशी आपली वागणुक सौजन्यशील असावी जेणेकरुन सण उत्सवाचा बंदोबस्त करणे किंवा जातीय दंगली सारखे प्रकरण हाताळणे सोपे जाईल.

17) **सामाजिक संघटना :-** विविध बंदोबस्त, महिलांमुले/ यांच्यावरील अत्याचार प्रसंगी अनेक सामाजिक संघटना पोलीसांच्या मदतीकरीता पुढे येतात. अशा सामाजिक संघटनांच्या सदस्यांशी देखील पोलीसांची वागणुक सौजन्यपुर्ण व आदरयुक्त असावी.

18) **शेतकरी कामगार :-** शेतकरी व कामगार आपल्या हक्कमागण्यांसाठी/ विविध प्रकारची आंदोलने करित असतात. अशी आंदोलने हाताळतांना व इतरवेळी देखील पोलीसांनी सामंजस्याची भूमिका ठेवली पाहीजे.

19) **विद्यार्थी :-** विद्यार्थी देखील आपल्या मागण्यांसाठी विविध प्रकारचे आंदोलने करतात. तसेच चारित्र्य पडताळणी, खेळाचे सामने याप्रसंगी त्यांचा पोलीसांशी संबंध येत असतो. पोलीसांनी विद्यार्थीशी संवेदनशीलपणे व्यवहार केला पाहिजे. जेणे करुन त्यांच्या मनात पोलीसांविषयी आदरयुक्त भावना निर्माण झाली पाहिजे व त्यांनी पोलीसांना आपला आदर्श मानला पाहिजे.

20) **गुन्हेगारीवर वचक :-** पोलीसांनी गुंडगिरी करणारे , महिलांची छेडछाड करणारे, अवैध धंदे करणारे लोकांच्या विरोधात कठोर कायदेशीर कारवाई करुन अशाकृत्यांचा बिमोड केला पाहिजे. जेणेकरुन सर्वसामान्य माणसामध्ये पोलीसांविषयी विश्वासाचे वातावरण निर्माण होईल.

21) **तक्रारदार, साक्षीदार, पंच यांच्याशी वागणुक :-** पोलीस स्टेशनला वेगवेगळया प्रकरणात तक्रारदार, साक्षीदार, पंच यांचा संबंध येत असतो. त्यांच्याशी पोलीसांची वागणुक सौजन्यपुर्ण असावी. त्यांना विनाकारण ताटकळत ठेवणे, वारंवार

बोलावणे चुकीचे आहे. त्यामुळे असे लोक पोलीसांना मदत करण्यास पुढे येत नाहीत.

22) **अवैध धंदयांना प्रतिबंध :-** पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध दारुचे धंदे, सट्टाजुगार-, काळया बाजाराने रॉकेल, गैस सिलेंडर ची विक्री व इतर अवैध धंदयांवर पोलीसांनी परिणामकारक कारवाई केल्यास जनमानसातील पोलीसांची प्रतिमा उंचावण्यास मदत होवुन पोलीस व जनतेचे संबंध चांगले राहतात.